
जनसंपर्क कक्ष
9 JUN 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ दहा हजार कडूलिंबाची रोपे लावणार

कोल्हापूर टाइम्स टीम

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ परिसरात आज कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे काही सेवाभावी संस्थांतर्फे विद्यापीठास विविध प्रकारची रोपेही भेट देण्यात आली. विद्यापीठ परिसरात दहा हजार कडूलिंबाची रोपे लावण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दूरशिक्षण विभागाच्या परिसरात कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह आंतरविद्याशाखा अधिष्ठाता व पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी.डी. राऊत, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उद्यान विभागाचे अधीक्षक ए.के. जाधव यांच्यासह विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या समवेत मोहिमेत सहभाग घेतला. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या परिसरात कोल्हापूर वन विभागाच्या सहकार्याने शंभर रोपे लावली. या वेळी उप-वनसंरक्षक सोनल कोंडुसकर, डॉ. जयदीप बागी आदी उपस्थित होते.

## ग्रीन कोल्हापूर

### 'कडूलिंब ऑक्सिजन पार्कचा मानस'

देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स कॉलेज, यशवंतनगर (चिखली), राजाराम बापू शुगर टेक्नॉलॉजी कॉलेज, इस्लामपूर, लायन्स क्लब ऑफ कोल्हापूर आणि इस्लामपूर तसेच इफको कंपनी यांच्याकडून शिवाजी विद्यापीठास कडुलिंबाची १०० रोपे प्रदान केली. प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, बाबासाहेब पवार, उमेश पवार, व्ही.आर. कलेडोणकर यांनी ही रोपे दिली. विद्यापीठाला कडुलिंबाची दहा हजार रोपे देणार असल्याचे डॉ.पाटील यांनी सांगितले.

9 JUN 2018

जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

कोल्हापूर टाइम्स टीम

शहरातील विविध संस्था, संघटनांतर्फे शिवराज्याभिषेक दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. येथील राजर्षी शाहू गव्हर्मेंट सर्व्हंटस को- ऑपरेटिव्ह बँकेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा झाला. बँकेचे अध्यक्ष रवींद्र पंदारे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्यासह संचालकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. यावेळी शशिकांत तिवले, प्रकाश पाटील, राजेंद्र चव्हाण, भरत पाटील, अतुल जाधव, रमेश घाटगे आदी उपस्थित होते.

हिंदू एकता आंदोलनतर्फे मिरजकर तिकटी येथे शिवराज्याभिषेक सोहळा आयोजित केला होता. मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन झाले. चंद्रकांत बराले, लाला गायकवाड, जयदीप शेळके, सुनील गायकवाड, किशोर घाटगे, दीपक मगदूम आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करीत असलेले भू विकास बँकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनीही शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आंदोलन सुरू केले. त्यामध्ये पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी एच. डी. जमादार, सुरेश पाटील, पी. वाय. शिंदे, एस. ए. पाटील, व्ही. वाय. पाटील आदी उपस्थित होते.



शिवराज्याभिषेक दिनी शिवाजी विद्यापीठातील अश्वारूढ शिवपुतळ्यास अभिवादन करताना प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्यासह अधिकारी

## शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील शिवपुतळ्यास बुधवारी पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्रा. डॉ. विजय ककडे, उपकुलसचिव डॉ. विलास सोयम, ए. एस. नलवडे, कायदा अधिकारी ॲड. अनुष्का कदम, सहाय्यक कुलसचिव बी. एन. वाघमोडे यांच्यासह प्रशासकीय सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.